रामावतार सुरजमल मोदी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बोरीगाव, ता. तलासरी, जि.पालघर या विद्यमान संस्थेमध्ये नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास इरादापत्र (LOI) देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन पुरकपत्र, क्र. आयटीआय- २०२५/प्र.क्र.८३/व्यशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: १३ मार्च, २०२६

**वाचा:-**

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र,
क्र. ०७/खा.औ.प्र. संस्था/इरादापत्र प्रस्ताव/२०२५/२३५, दि. २.५.२०२५ व
पत्र क्र.०७/नावात दुरुस्तीबाबत/२०२५/६६१, दि.१.१२.२०२५

२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय,
समक्रमांक, दि.५.२.२०२६.

**प्रस्तावना :-**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत पात्र खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास/तुकडीवाढ करण्यास शासनाची मान्यता मिळण्यासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने वाचा येथील दि.५.२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये सन २०२६-२०२७ या वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थां सुरू करण्यास / तुकडीवाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरहू संस्थांशिवाय उर्वरित संस्थांना सन २०२६-२७ पासून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन पुरकपत्र :-**

सन २०२६-२०२७ या वर्षापासून, रामावतार सुरजमल मोदी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बोरीगाव, तालुका तलासरी, जिल्हा पालघर या कायम विनाअनुदान तत्वावरील विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये “सुईंग टेक्नॉलॉजी” या अभ्यासक्रमाची १ +१ तुकडया सुरु करण्यास, वाचा येथील दि.५.२.२०२६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी-शर्तीपैकी (१ ते १७) ज्या अटी-शर्ती सदरहू संस्थेस लागू होतील, त्या अटी-शर्तीचे पूर्णतः पालन करण्याच्या अधिन राहून इरादापत्र (LOI) देण्यात येत आहे.

सदरचे शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०३१३१७५३५५३९०३ असा आहे. हे पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHAROSE MUNJA UMARAO

Digitally signed by BHAROSE MUNJA UMARAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=F3ABF3AB8B16DFEC487F18CE64D6B0AB8E38D8925D44D15F7DBD61BABB4AE6DF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B015B0D7AFAA0DB7C0603C5C954E6816492DBB5F94AB286DA7F224853A4EEBF, cn=BHAROSE MUNJA UMARAO
Date: 2026.03.13 17:54:45 +05'30'

**(मुं. उ. भरोसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

(१) मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(२) अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती/नागपूर विभाग.
(५) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
(६) संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
(७) निवड नस्ती, (व्यशि-३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

* * * * * * * * *